निगमित संप्रेषण एवं निवेशक संबंध
प्रधान कार्यालय : लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे - 5
टेली : 020-25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

# प्रेस विज्ञप्ति

## बँक ऑफ महाराष्ट्रने साजरा केला 74 वा स्वातंत्र दिन

पुणे, 15 ऑगस्ट 2020: बँक ऑफ महाराष्ट्रने 74 वा स्वातंत्र्य दिन बँकेच्या लोकमंगल स्थित मुख्यालयी साजरा केला. बँकेचे व्यस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. एस. राजीव यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर राष्ट्रगीताचे समूह गायन झाले. यावेळी बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा उपस्थित होते.

यावेळी उपस्थित उच्च पदस्थ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना संबोधताना श्री राजीव म्हणाले की, बँक ऑफ महाराष्ट्रने देशातील जनतेला आर्थिक स्वातंत्र्य देण्याच्या प्रक्रियेमध्ये प्रमुख भूमिका वटवली आहे आणि यापुढेही असेच परिश्रम घेऊन सामान्य नागरिकांच्या पसंतीची बँक म्हणून कार्य करेल. त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना आवाहन केले की, ग्राहक सेवा, कर्ज वाटप वृद्धी, बचत आणि चालू खात्यामध्ये वाढ आणि थकीत कर्जामध्ये घट या मापदंडाच्या अधिक चांगल्या निकालासाठी समर्पित भावनेने काम करावे.



फोटो मध्ये: बँकेचे व्यस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव, बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा.